**MHNS280022172023**

**विशेष दिवाणी दावा क्र.५४९/२०२३ मध्ये निशाणी क्र.२५ वर आदेश**

वादींनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० आणि आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा दुरूस्तीसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी कथन करतात की, प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द वाटप, तुटक कब्जा तसेच जाहीर ठराव आणि मनाई हुकूम इत्यादी दादींसाठी दाखल केला आहे. वादी पुढे कथन करतात की, प्रतिवादींनी दाव्यामध्ये कैफियत दाखल केली असुन गणपत कृष्णा आव्हाड यांचे वारस तसेच ज्या वित्तीय संस्थांचा बोजा दावा मिळकतींवर आहे त्यांना पक्षकार म्हणुन दाव्यात सामील केले नसल्याचे तसेच काही मिळकती देखील दाव्यामध्ये सामील केल्या नाहीत असा बचाव घेतलेला आहे. सबब, दाव्यास तांत्रिक बाध निर्माण होवु नये म्हणुन मिळकतींच्या उता—यांमध्ये असलेले सह हिस्सेदार आणि वित्तीय संस्था तसेच ज्या मिळकती याबाबत वादींना माहिती मिळाली आहे त्यासंदर्भाने दाव्यात दुरूस्ती करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे प्रतिवादी क्र.५ ते १६ यांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन सामील करणे आवश्यक आहे. तसेच दावा मिळकत—१क यामध्ये विहिरीचा हिस्सा नमुद करणे आणि परिच्छेद कलम १ मध्ये परिशिष्ठ—अ च्या शेवटी १ग म्हणुन एकत्रित मिळकत दाव्यामध्ये समाविष्ठ करणे आवश्यक आहे.

३. वादी पुढे कथन करतात की, त्यांची प्रस्तावित प्रतिवादी क्र.५ ते ११ यांच्या विरूध्द कोणतीही मागणी नाही. परंतु प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी घेतलेल्या हरकतीप्रमाणे दाव्यास तांत्रिक बाधा उत्पन्न होवु नये म्हणुन त्यांना दाव्यात सामील करावयाचे आहे. तर दावा कलम १अ मधील काही क्षेत्र हे प्रस्तावित प्रतिवादी क्र.१२ याच्या मालकीचे आहे. तसेच सदर मिळकतीपैकी काही क्षेत्र प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ महाराष्ट्र शासन यांनी पाझर तलावासाठी संपादन केलेले आहे. तसेच सदर मिळकतीतील काही क्षेत्रामध्ये प्रस्तावित प्रतिवादी क्र.१४ यांची पाईपलाईन आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र.१५ व १६ यांचा दावा मिळकतीवर बोजा आहे. प्रस्तावित प्रतिवादी क्र.१३ ते १६ यांच्याबाबत देखील वादीला कोणतीही दाद मागावयाची नाही. परंतु दाव्यास तांत्रिक बांधा उत्पन्न होवु नये म्हणुन त्यांना

प्रतिवादीपणात सामील करावयाचे आहे. सदरच्या दुरूस्तीने वादी कोणतीही नवीन केस करू पाहत नाही अथवा दाव्याच्या स्वरूपामध्ये बदल होत नाही. सदर दुरूस्ती मंजुर झाल्यास प्रतिवादींचे काही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात यावा अशी वादींनी विनंती केली आहे.

४. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी सदर अर्जास हरकत घेतांना प्रस्तुत अर्जावरच त्यांचे म्हणणे दाखल केलेले आहे. प्रतिवादी कथन करतात की, प्रस्तुत अर्ज खरा व कायदेशीर नाही. प्रस्तुत दाव्यामध्ये त्यांनी दि.१७/०९/२०१९ रोजी निशाणी क्र.१८ वर त्यांची कैफियत दिलेली आहे. तथापि, वादी प्रस्तुतचा अर्ज दाखल करून दावा पुराव्याला असतांना दाव्याचे काम लांबणीवर टाकु पाहत आहे. प्रस्तुत अर्जावर इतर वादींच्या सहया नाहीत. त्यामुळे वादी क्र.३ च्या मागणीनुसार प्रस्तुत अर्ज मान्य करता येणार नाही. सबब, प्रस्तुतचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती त्यांनी केली आहे.

५. उपरोक्त नमुद परस्पर विरोधी अभिकथनांच्या अनुषंगाने अभिलेखाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षाच्या वकिलांचा युक्तीवाद ऐकला. दोन्ही विधिज्ञांनी त्यांच्या अभिकथनाप्रमाणेच त्यांचा युक्तीवाद असल्याचे नमुद केले. अभिलेखाच्या अवलोकनामुळे लक्षात येते की, वादीने प्रस्तुतचा दावा वाटप, तुटक कब्जा तसेच जाहीर ठराव आणि मनाई हुकूम इत्यादी दादींसाठी दाखल केलेला आहे. माझे पुर्व पिठासीन अधिकारी यांनी दाव्यातील पक्षकारांच्या परस्पर विरोधी अभिकथनाच्या आधारे मुद्दे निर्धारित केलेले आहे. तदनंतर वादींनी अद्याप त्यांचे पुराव्याचे प्रतिज्ञापत्र अभिलेखावर दाखल केलेले नाही. अभिलेखाच्या अवलोकनावरून असे लक्षात येते की, मुद्दे निर्धारित झाल्यानंतर सदर प्रकरण या न्यायालयाकडे वर्ग करण्यात आल्यानंतर पक्षकारांच्या नोटीस बजावणीमध्ये वेळ व्यतित झालेला आहे. प्रस्तुत अर्जाव्यतिरिक्त दाव्याचे कामकाज वादींनी पुरावा देण्यासाठी प्रलंबित आहे.

६. प्रस्तुत अर्जाच्या संदर्भाने प्रतिवादी यांनी उपस्थित केलेले आक्षेप विचारात घेतले असता मुद्दे निर्धारित झाल्यानंतर अद्याप दाव्याची संपरिक्षा सुरू का झाली नाही. याबाबत उपरोक्त नमुद परिस्थिती कारणीभुत आहे. सबब, दाव्याची संपरिक्षा सुरू झाली नसल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ मध्ये नमुद असलेल्या स्पष्टीकरणाची बाधा प्रस्तुत अर्जास निर्माण होत नाही. याशिवाय, प्रतिवादी यांनी उपस्थित केलेला आक्षेप की, प्रस्तावित दुरूस्तीच्या संदर्भाने आवश्यक माहिती ही वादी यांना कैफियत दाखल झाल्यानंतर मिळालेली असतांना देखील सदरचा अर्ज विलंबाने दाखल

करण्यात आलेला आहे. त्यामुळे कायदेशीर तरतुदीमध्ये नमुद असलेला Due Diligence या मुद्दयाची पुर्तता होत नाही. तसेच दाव्याच्या स्वरूपामध्ये बदल होत आहे हा आक्षेप देखील नोंदवलेला आहे. त्या संदर्भाने प्रस्तावित दुरूस्तीचे अवलोकन केले असता वादी दाव्यामध्ये कलम नमुद मिळकतीमध्ये असलेली विहीर व त्यातील हिस्सा तसेच एकत्रित संचयाची दाव्यामध्ये समाविष्ठ करण्यास राहुन गेलेली एक शेतजमीन मिळकत परिच्छेद कलम १ मधील परिशिष्ठ—अ मध्ये अंतर्भुत करून मागत आहे व प्रतिवादी यांच्या बचावाप्रमाणे दावा मिळकतींच्या अधिकार अभिलेख सदरी असलेले इतर सह हिस्सेदार तसेच मिळकतींवर बोजा असणा—या वित्तीय संस्था यांना दाव्यामध्ये आवश्यक पक्षकार म्हणुन सामील करावे अशी मागणी करत आहे. या व्यतिरिक्त वादींनी दाव्याच्या मागणी कलमामध्ये कोणतीही दुरूस्ती मागितलेली नाही. तसेच औपचारीक पक्षकार म्हणुन दाव्यामध्ये समाविष्ठ करू पाहत असलेल्या प्रतिवादींविरूध्द वादी कोणतीही दाद मागत नाही. त्यामुळे दाव्याच्या स्वरूपामध्ये बदल होत नाही असा निष्कर्ष सद्यस्थितीत निघतो. याशिवाय, प्रतिवादींनी उपस्थित केलेला Due Diligence या मुद्दयाबाबत वादींतर्फे कोणतेही स्पष्टीकरण अर्जामध्ये अथवा युक्तीवादादरम्यान देण्यात आलेले नाही. परंतु त्या आधारावर प्रस्तुतचा अर्ज निर्णित करणे न्यायोचित होणार नाही त्यासाठी वादीला प्रतिवादींना खर्च देण्याबाबत आदेशित करता येवु शकेल. तसेच या ठिकाणी नमुद करणे आवश्यक आहे की, प्रस्तावित दुरूस्तीची पुरावा कायदयाच्या अनुषंगाने असलेली ग्राहयता हा संपरिक्षेचा विषय आहे. त्यामुळे प्रस्तावित दुरूस्ती मंजुर केल्यास दोन्ही पक्षांना संपरिक्षेदरम्यान त्याबाबत त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणार आहे. सबब, सदरचा अर्ज मंजुर करणे न्यायोचित होईल. करिता, उपरोक्त कारणमिमांसेच्या आधारे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## **<u>आदेश</u>**

१. अर्ज निशाणी क्र.२५ हा वादींनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना खर्च रक्कम रू.१०००/—(एक हजार रूपये मात्र) देण्याच्या अटीवर मंजुर करण्यात येतो.

२. वादींनी खर्च रक्कम देण्याची पुर्तता करून पुढील तारखेच्या आत मुदतीत दुरूस्ती करून दुरूस्तप्रत दाखल करावी.

SACHIN HINDURAO KHADE
Digitally signed by SACHIN HINDURAO KHADE
Date: 2025.12.13 10:53:33 +0530

दि.१२/१२/२०२५

(सचिन एच.खाडे)
दिवाणी न्यायाधीश,व.स्तर,सिन्नर